प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) घटकाची सन २०१७-१८ मध्ये राज्यात सर्वसाधारण प्रवर्गासाठी अंमलबजावणीसाठी केंद्र हिश्श्याचा रु. २३९९.३१ लक्ष निधी वितरीत करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/१४अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा

१) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) घटकाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.१९-१/२०१७-RFS-III, दि.१२ एप्रिल, २०१७
३) शासन निर्णय क्र.कृयांऊ-२०१७/प्र.क्र.६४/१७/राकृवियो, दि.१३ एप्रिल, २०१७
४) शासन पत्र क्र. सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४-अे, दि. २१ एप्रिल, २०१७
५) शासन पत्र क्र. सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४-अे, दि. २४ एप्रिल, २०१७
६) शासन पत्र क्र. सुसिंयो-२११७/प्र.क्र.९०/१७/४-अे, दि. १३ जून, २०१७
७) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.२१-१३/२०१७-RFS-III, दि.१४ जून, २०१७ (३ पत्रे)
८) शासन निर्णय क्रमांक- सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४अे, दि. ७ ऑगस्ट, २०१७
९) शासन निर्णय क्रमांक- सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/४अे, दि. १५ सप्टेंबर, २०१७
१०) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.२१-१३/२०१७-RFS-III, दि. १५ फेब्रुवारी, २०१८.
११) शासन निर्णय क्रमांक- सुसिंयो-२११७/प्र.क्र.१०७/१७/१४अे, दि.१ मार्च, २०१८
१२) केंद्र शासनाचे पत्र क्र. F.No.२१-१३/२०१७-RFS-III, दि. २८ मार्च, २०१८.

प्रस्तावना:

सुक्ष्म सिंचन योजना सन २०१४-१५ या वर्षात केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत - शेतावरील पाणी व्यवस्थापन उप अभियान म्हणून राबविण्यात आली. सदरहू उप अभियानामध्ये केंद्र व राज्य हिश्श्याचे प्रमाण ८०:२० असे होते. सन २०१५-१६ पासून, केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत- प्रति थेंब अधिक पिक (सुक्ष्म सिंचन) या घटकांतर्गत राबविण्यात येत आहे. यामध्ये केंद्र राज्य हिश्श्याचे प्रमाण ६०: ४० असे आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र. २ येथील दि. १२ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यासाठी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत- प्रति थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) घटकांतर्गत सूक्ष्म सिंचन योजनेसाठी रु. ३८००० लक्ष नियतव्यय कळवून त्याप्रमाणात राज्य हिश्श्यासह वार्षिक कृती आराखडा सादर करण्याबाबत कळविले. त्यानुसार संदर्भाधीन अ.क्र.४ येथील दि. २१ एप्रिल, २०१७ च्या पत्रान्वये केंद्र हिस्सा रु.३८००० लक्ष व त्याप्रमाणात राज्य हिस्सा रु.२४०६७ लक्ष असा एकूण रु.६२०६७ लक्ष रकमेचा कार्यक्रम केंद्र शासनास सादर करण्यात आला. केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र.७ येथील दि. १४ जून, २०१७ च्या पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु.१६३४० लक्ष, अनुसूचित जातीसाठी रु.१५२० लक्ष व अनुसूचित जमातीसाठी रु.११४० लक्ष असा एकूण रु. १९००० लक्ष एवढा निधी वितरीत केला होता.

संदर्भाधीन अनु.क्र.८ येथील दि. ७ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकांतर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेच्या सन २०१७-१८ च्या रु.६२०६७ लक्ष रकमेच्या वार्षिक कृति आराखड्यास प्रशासकीय मान्यता व सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. १६३४० लक्ष व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु.११४० लक्ष अशा एकूण रु.१७४८० लक्ष रक्कमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्यात आली. संदर्भाधीन अनु.क्र.९ येथील दि. १५ सप्टेंबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु. १५२० लक्ष रक्कमेच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाने संदर्भाधीन अनु.क्र.१० येथील दि. १५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र हिश्श्याचा रु. ९५०० लक्ष एवढा निधी वितरीत केला होता. सदर निधी संदर्भाधीन अनु.क्र.११ येथील दि. १ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, कृषी यांना वितरीत करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अनु.क्र.१० येथील दि. १५ फेब्रुवारी, २०१८ च्या पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र हिश्श्याचा रु. ९५०० लक्ष एवढा निधी वितरीत केला होता. सदर निधी संदर्भाधीन अनु.क्र.११ येथील दि. १ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये आयुक्त, कृषी यांना वितरीत करण्यात आला आहे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन अनु.क्र.१२ येथील दि. २८ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. २३९९.३१ लक्ष, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु. २१५.३९ लक्ष व अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी रु.३८५.३० लक्ष असा एकणू रु. ३००० लक्ष निधी वितरीत केला आहे. सदर निधीपैंकी सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. २३९९.३१ लक्ष निधी आयुक्त,कृषी यांना बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

१. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाची सर्वसाधारण प्रवर्गासाठी सन २०१७-१८ या वर्षात अंमजबजावणी करण्यासाठी केंद्र हिश्श्याचा रु.२३९९.३१ लक्ष (अक्षरी : रुपये तेवीस कोटी नव्याण्णव लाख एकतीस हजार फक्त) निधी बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च खालील लेखाशिर्षाखालील सन २०१७-१८ च्या मंजुर तरतुदीतून भागविण्यात यावा.

मागणी क्र. डी-३
२४०१, पिक संवर्धन
११३, कृषि अभियांत्रिकी
(००)(०७) प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन)
(केंद्र हिस्सा ६०%) (सर्वसाधारण)
(२४०१२५०४),
३३ अर्थसहाय्य

३. सदर निधी सर्वसाधारण प्रवर्गासाठी वापरण्यात यावा.

४. सदरचा निधी हा PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना वितरीत होत असल्याची खातरजमा आयुक्त, कृषी यांनी करावी.

५. केंद्र हिश्श्याच्या प्रमाणात राज्य हिश्श्याचा आवश्यक निधी जिल्हा विकास निधी मधून उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी करावी.

६. सदर निधी खर्च करताना केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रती थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या मार्गदर्शक सूचना, संदर्भाधीन अनु.क्र.८ येथील दि.७ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचना, अटी व शर्ती तसेच राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. मंजूर निधीचे जिल्हा निहाय वितरण करण्यास तसेच खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी कृषी संचालक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राज्य नियंत्रक म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, सदर योजनेंतर्गत मंजूर केलेला निधी आहरीत व संवितरीत करण्याचे अधिकार कृषी आयुक्तालयस्तरावर सहायक संचालक, लेखा- १, विभागीय कृषी सह संचालक कार्यलयातील लेखाधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी, उप विभागीय कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

८. केंद्र शासनाच्या, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना- प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन) घटकाच्या मार्गदर्शक सूचनानूसार अनुज्ञेय प्रशासकीय खर्चाची रक्कम, मार्गदर्शक सूचनानूसार अनुज्ञेय बाबींवरच खर्च करण्यात यावी.

९. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून,२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन व सदर शासन परिपत्रकातील अटींची पूर्तता करुन मा.अपर मुख्य सचिव (कृषी) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११९४०४९४३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2018.03.31 19:41:54 +05'30'

(श्रीकांत आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त (कृषी),कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सचांलक (फलोत्पादन), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मा.मंत्री (कृषी व फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (कृषी व पणन) यांचे खाजगी सचिव
५) प्रधान सचिव (कृषी) यांचे स्विय सहायक
६) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव (जलसंधारण व रोजगार हमी योजना), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) सचिव (ला.क्षे.वि.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परिषदा)
११) मुख्य कार्यकारी अधिकारी,वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,पुणे
१२) संशोधन संचालक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
१३) संशोधन संचालक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
१४) संशोधन संचालक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली
१५) संशोधन संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

१६) सर्व संचालक, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) संचालक, कृषी हवामान शास्त्र विभाग, पुणे.
१८) भारतीय हवामान शास्त्र विभाग, पुणे.
१९) विभाग प्रमुख, एकात्मिक जल व्यवस्थापन, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
२०) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, महात्मा फुले कृषी विद्यापिठ, राहुरी
२१) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठ, परभणी
२२) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापिठ, दापोली
२३) विभाग प्रमुख, सिंचन व निचरा अभियांत्रिकी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठ, अकोला
२४) सर्व विभागीय कृषी सहसंचालक
२५) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी (सर्व)
२६) सर्व कृषी विकास अधिकारी/सर्व उपविभागीय कृषी अधिकारी/सर्व तालुका कृषी अधिकारी/
२७) सर्व मंडळ कृषी अधिकारी
२८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षण) महाराष्ट्र -१/२ मुंबई/नागपुर
३०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
३१) संचालक, लेखा व कोषागार, मुंबई
३२) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी.
३३) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी
३४) लेखा,कोकण/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपुर
३५) उप संचालक, लेखा व कोषागारे कोकण/ नाशिक/पुणे/ औरंगाबाद/अमरावती/ नागपुर
३६) सर्व कार्यासने व पर्यवेक्षिय अधिकारी (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३७) निवडनस्ती.